Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal
Online Available at www.cmrj.in
ISSN No.2456-1665

# जालना जिल्ह्यातील शेतमजुर कुटूंबाची आर्थिक स्थिती: एक समाजशास्त्रीय अध्ययन

**डॉ. वैद्य आर.जे.**
सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग,
मत्स्योदरी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
अंबड, जि. जालना

**प्रस्तावना:**

भारतातील असंघटित कामगारांध्ये शेतीत काम करणाऱ्या कामगारांचे प्रमाण मोठे आहे. शेतमजुरांबरोबरच अल्पभूधारक शेतकरी हे स्वत:च्या शेतीतून मिळणारे उत्पन्न तोकडे असल्याने इतरांच्या शेतांवर/इतरत्र कामाला जातात. त्यामुळे त्यांचीही गणना शेतमजुरांमध्येच केली जाते. याशिवाय मासेमारी करणारे,जंगलात काम करणारे, फळबागांध्ये काम करणारे अशांचेही प्रमाण मोठे आहे.

भारत देशाला आज बदलत्या पर्यावरणाबरोबरच पावसाच्या अनिश्चिततेला सामोरे जावे लागत आहे. कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टी, काही वेळा गारपीटीने पिकांचे होणारे नुकसान त्यामुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या हे सुद्धा एक महत्त्वाचे उदाहरण आपल्याला पहायला मिळत आहे. त्याचबरोबर आहे ती शेतजमीन विकून फोफावत जाणारी बिल्डर लॉबी, त्याचप्रमाणे शेतीला उपलब्ध न होणारा मजूर वर्ग त्यामुळे शेतीप्रधान भारताचे आजचे चित्र बदललेले दिसून येत आहे.

**संशोधन पध्दती:**

सदरील संशोधन लेखामध्ये जालना जिल्ह्यातील शेतमजुर कुटूंबाची आर्थिक स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन करण्याचा उद्देश निहित आहे. यासाठी संशोधनकाने जिल्ह्यातील तालुकानिहाय ५ शेतमजुर कुटूंबाची स्तरीत यादृच्छिक नमुना निवड करुन मुलाखत अनुसूचिव्दारे माहिती गोळा केली. या माहितीवरुन तक्ते तयार करण्यात आले व त्याअनुषंगाने विश्लेषण करण्यात आले आहे.

**विश्लेषण:**

**जालना जिल्ह्यातील शेतमजुर कुटूंबांची जमीनधारणा विषयक स्थिती:**

भारतीय समाज हा शेतीप्रधान समाज आहे. शेतीची मालकी इथल्या व्यक्तीला वंशपरंपरेने प्राप्त होत असते. शेतमजुर कुटूंबाकडे जमीन धारणा ही अत्यल्प असल्यानेच तो शेतमजुर झालेला असतो. जमीनधारणेचा शेतमजुराच्या आर्थिक जीवनावर परिणाम झालेला दिसून येतो. याच अनुषंगाने शेतमजुर कुटूंबाची जमीनधारणाविषयक स्थिती काय आहे याविषयीची माहिती तक्ता क्र. १ मध्ये दर्शविली आहे.

Online Available at www.cmrj.in
ISSN No.2456-1665

तक्ता क्र. १

**शेतमजुर कुटूंबांची जमीनधारणा विषयक स्थिती**

| अ.क्र. | तपशील | नमुना शेतमजुरांची संख्या | % |
|---|---|---|---|
| १ | जमीन आहे | १० | २५ |
| २ | जमीन नाही | ३० | ७५ |
| | एकूण | ४० | १०० |

स्त्रोत: सर्वेक्षण

तक्ता क्र. १ मधील नमुना शेतमजुर कुटूंबांची जमीनधारणाविषयक स्थिती अशी दर्शविते की, २५ टक्के नमुना शेतमजुर कुटूंबांकडे जमीन आहे तर याउलट ७५ टक्के नमुना शेतमजुर कुटूंबांकडे जमीन नसल्याचे दिसून येते. जमीन असणाऱ्या शेतमजुर कुटूंबाकडे सदरील क्षेत्र हे कोरडवाहू स्वरुपाचे आहे. त्यामुळे त्यातून फारसा फायदा होत नसल्याचेही नमुना शेतमजुर कुटूंबांनी नमूद केले आहे.

**शेतमजुर कुटूंबांचे मासिक उत्पन्न :**

शेतमजुर हा असा पेशा आहे ज्यामध्ये अंगमेहनतीचे काम असले तरी त्यांना त्यांच्या मेहनतीच्या तुलनेत योग्य असे उत्पन्न मिळत नाही. यातच त्यांच्या कुटूंबात कमावणाऱ्या सदस्यांनी संख्या कमी व त्यावर अवलंबून असणाऱ्यांची संख्या जास्त असेल तर अशा कुटूंबात मुलभूत गरजा भागविण्यासंबंधीचे प्रश्न निर्माण होतात. नमुना शेतमजुर कुटूंबांच्या मासिक उत्पन्नाचा अभ्यास केला असता जी तथ्ये संकलित झाली ती तक्ता क्र.२ मध्ये दर्शविण्यात आली आहेत.

तक्ता क्र.२

**नमुना शेतमजुर कुटूंबांच्या कुटुंबाचे मासिक उत्पन्न**

| अ.क्र. | मासिक उत्पन्न | नमुना शेतमजुरांची संख्या | % |
|---|---|---|---|
| १ | रु.१५,००० पेक्षा कमी | २६ | ६५ |
| २ | रु.१५,००१ ते रु.३०,००० | ११ | २७.५ |
| ३ | रु.३०,००१ ते रु.४५,००० | ३ | ७.५ |
| ४ | रु.४५,००० पेक्षा जास्त | ० | ०.०० |
| | एकूण | ४० | १००.०० |

स्त्रोत: सर्वेक्षण

तक्ता क्र. २ मध्ये नमुना शेतमजुर कुटूंबांना विविध मार्गानी मिळणाऱ्या मासिक उत्पन्नाचा तपशिल असे दर्शवितो की, एकूण नमुना शेतमजुर कुटूंबांपैकी ६५ टक्के कुटुंबाचे मासिक उत्पन्न १५००० रूपयापेक्षा कमी मिळत आहे तर १५००१ ते ३०,००० रूपये मासिक उत्पन्न मिळणाऱ्या कुटूंबाचे प्रमाण २७.५ टक्के एवढे आहे. तसेच ३०,००१ ते ४५००० हजार रूपयापर्यंत मासिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण केवळ ३ टक्के एवढे असून ४५००० हजारापेक्षा जास्त मासिक उत्पन्न असणारे एकही कुटूंब नाही. यावरुन असे लक्षात येते की, शेतमजुर कुटूंबाचे उत्पन्न हे कमी आहे.

**शेतमजुर कुटूंबाची मासिक बचतीच्या सवयीविषयीची माहिती:**

सामान्यत: व्यक्ती गरजांची पूर्तता करण्यासाठी मिळवलेली मिळकत ही खर्च करतो तर उरलेल्या पैशाची बचत करतात. परंतु तज्ञांच्या मते आधी बचत करावी आणि मग उरलेल्या रकमेतून गरजांची पूर्तता करावी जेणेकरुन व्यक्तीचे भविष्य हे सुखदायी होऊ शकते. भविष्याच्या दृष्टीने मासिक बचत करणे चांगले असले तरी बहुतांश व्यक्ती ह्या आर्थिकदृष्ट्या कमकूवत असल्याने त्यांना बचत करणे शक्य होत नाही. जालना जिल्ह्यातील शेतमजुरु कुटूंबाची संदर्भातील बचतीची स्थिती काय आहे हे तपासण्याच्या दृष्टीने संकलित माहिती तक्ता क्र. ३ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

तक्ता क्र. ३

**शेतमजुर कुटूंबाची मासिक बचतीच्या सवयीविषयीची माहिती**

| अ.क्र. | तपशील | नमुना शेतमजुरांची संख्या | एकूण प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | मासिक बचत करत नाही | ३३ | ८२.५ |
| २ | मासिक बचत करतात | ७ | ७.५ |
| | एकूण | ४० | १०० |

स्त्रोत: सर्वेक्षण

तक्ता क्र. ३ मधील शेतमजुर कुटूंबाची मासिक बचतीची सवयीविषयीची माहिती असे दर्शविते की, फक्त ७.५ टक्के शेतमजुर कुटूंबे ही थोडी फार मासिक बचत करत असल्याचे दिसते तर ८२.५ टक्के शेतमजुर कुटूंबे ही बचत करत नसल्याचे दिसून येते. बचत न करण्याविषयी कारणे विशद करतांना त्यांनी सांगितले की, त्यांना मिळणाऱ्या उत्पन्नातून त्यांच्या कुटूंबाचे भरणपोषण होते परंतु बचत करण्यासाठी फारशी शिल्लक उरत नाही.

**शेतमजुर कुटूंबांकडे कर्जाची स्थिती:** शेतमजुर कुटूंबांची कर्जाची स्थिती काय आहे याचे विवरण तक्ता क्र. ४ मध्ये दर्शविले आहे.

तक्ता क्र.४

**शेतमजुर कुटूंबांकडे कर्जाची स्थिती**

| अ.क्र. | तपशील | नमुना शेतमजुरांची संख्या | % |
|---|---|---|---|
| १ | कर्ज आहे | २७ | ६७.५ |
| २ | कर्ज नाही | १३ | ३२.५ |
| | एकूण | ४० | १०० |

स्त्रोत: सर्वेक्षण

तक्ता क्र. ४ मधील नमुना शेतमजुर कुटूंबांकडे कर्जाची स्थिती अशी दर्शविते की, ६७.५ टक्के नमुना शेतमजुर कुटूंबांकडे कर्ज आहे तर याउलट १३ टक्के शेतमजुर कुटूंबांकडे कर्ज नसल्याचे दिसून येते. नमुना शेतमजुर कुटूंबांशी केलेल्या चर्चेतून असे लक्षात येते की, बऱ्यास वेळेस मित्र, नातेवाईक किंवा ओळखितल्या व्यक्तीकडून मदत न मिळाल्यामुळे किंवा मोठ्या रकमेची गरज असल्याने त्यांना बँक किंवा सावकार अशा दोन पर्यायाची चाचपणी करावी लागते.

**शेतमजुर कुटूंबांनी घेतलेल्या कर्जाची कारणे:**

प्रत्येक व्यक्तिला दैनंदिन कौटुंबिक गरजा भागविण्यासाठी पैशाची गरज असते. प्रत्येक व्यक्ती आपआपल्या योग्यतेनुसार काम करत असतो व त्यातून तो आर्थिक गरजांची पूर्तता करत असतो. परंतु जीवनात काही आकस्मिम गरजा येतात आणि अशा वेळेस पैशांच्या गरजाची पूर्तता करणे त्याला शक्य होत नाही. नमुना शेतमजुर कुटूंबांकडे असलेल्या कर्जाची कारणे काय आहे याचे विवरण तक्ता क्र. ५ मध्ये दर्शविले आहे.

तक्ता क्र. ५

**शेतमजुर कुटूंबांकडे असलेल्या कर्जाची कारणे**

| अ.क्र. | कारणे | नमुना शेतमजुरांची संख्या | % |
|---|---|---|---|
| १ | आजारावरील खर्चासाठी | ६ | १५.०० |
| २ | लग्नकार्ये | १६ | ४०.०० |
| ३ | बेरोजगारी | ३ | ७.५० |
| ४ | घरबांधणी / घरदुरुस्ती | ५ | १२.५० |
| ५ | मुलांची शिक्षण | ४ | १०.०० |
| ६ | प्रासंगिक व इतर | ६ | १५.०० |
| | एकूण | ४० | १००.०० |

स्त्रोत: सर्वेक्षण

तक्ता क्र. ५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे उत्तरदात्यांची विविध कारणे कर्ज घेण्याची निदर्शनास येत असली

तरी सर्वात जास्त कर्जाचे मुख्य कारण लग्नासाठी कर्ज घेणे हे दिसते. हे प्रमाण ४० टक्के इतके आहे. शहरी भागात जाऊन उपचार घेण्यासाठी कर्ज घेणाऱ्यांचे प्रमाण १५ टक्के एवढे आहे. मुलांचे शिक्षण तसेच मुलांना उच्च शिक्षणासाठी पाठविण्यासाठी कर्ज घेण्याचे प्रमाण १० टक्के इतके असल्याचे दिसते. १२.५० टक्के शेतमजुर कुटूंबानी घरबांधणी किंवा दुरुस्ती यासाठी कर्ज घेतलेले आहे असे सांगितले तर प्रांसगिक व इतर बाबींसाठी १५ टक्के कुटूंबानी कर्ज घेतल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष :**

संशोधनाअंती असे दिसते की, २५ टक्के नमुना शेतमजुर कुटूंबांकडे जमीन आहे तर याउलट ७५ टक्के नमुना शेतमजुर कुटूंबांकडे जमीन नसल्याचे दिसून येते, एकूण नमुना शेतमजुर कुटूंबांपैकी ६५ टक्के कुटुंबाचे मासिक उत्पन्न १५००० रूपयापेक्षा कमी मिळत आहे तर १५००१ ते ३०,००० रूपये मासिक उत्पन्न मिळणाऱ्या कुटूंबाचे प्रमाण २७.५ टक्के एवढे आहे. तसेच ३०,००१ ते ४५००० हजार रूपयापर्यंत मासिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण केवळ ३ टक्के एवढे असून ४५००० हजारापेक्षा जास्त मासिक उत्पन्न असणारे एकही कुटूंब नाही, फक्त ७.५ टक्के शेतमजुर कुटूंबे ही थोडी फार मासिक बचत करत असल्याचे दिसते तर ८२.५ टक्के शेतमजुर कुटूंबे ही बचत करत नसल्याचे दिसून येते. ६७.५ टक्के नमुना शेतमजुर कुटूंबांकडे कर्ज आहे तर याउलट १३ टक्के शेतमजुर कुटूंबांकडे कर्ज नसल्याचे दिसून येते. उपचार घेण्यासाठी कर्ज घेणाऱ्यांचे प्रमाण १५ टक्के एवढे आहे. मुलांचे शिक्षण तसेच मुलांना उच्च शिक्षणासाठी पाठविण्यासाठी कर्ज घेण्याचे प्रमाण १० टक्के इतके असल्याचे दिसते. १२.५० टक्के शेतमजुर कुटूंबानी घरबांधणी किंवा दुरुस्ती यासाठी कर्ज घेतलेले आहे. संशोधनांती असे दिसून येते की, जिल्ह्यातील शेतमजुर कुटंबाची स्थिती ही दयनिय स्वरुपाची दिसून येते.

**संदर्भ :**


- सिरसाठ, सतीश (२०१०): असंघटित कामगार, पुणे विद्यापीठ, पुणे
- राष्ट्रीय कामगार आयोग अहवाल (१९६९): श्रम मंत्रालय, भारत सरकार, दिल्ली
- वर्मा, रविंद्र (२००२): राष्ट्रीय श्रमीक आयोग अहवाल (दुसरा), भारत सरकार, दिल्ली, संकेतस्थळ: www.planningcommission. nic.in /wg11_rplabr. doc
- इथापे, एन.के. (२०१६): कामगार कायदे - भाग ३, चेतक बुक्स, पुणे
- Bhalla G.S. (2008): “Globalisation and Employment Trends in India”, The Indian Journal of Labour Economics, Vol.51.